**ठळक बातम्या**

- आगामी विधानसभा निवडणूक आपापल्या मित्रपक्षांसोबत एकत्रितपणे लढवण्याची महायुती आणि महाविकास आघाडीची भूमिका
- मायक्रोसॉफ्ट कंपनीचं सॉफ्टवेअर बंद पडल्यानं जगभरातले उद्योग, बँकिंग सेवा आणि विमान कंपन्यांची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा कोलमडली
- वादग्रस्त प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्या विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून गुन्हा दाखल, निवड रद्द का करु नये यासाठी कारणे दाखवा नोटीसही जारी
- महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारताचा आज पाकिस्तानशी सामना, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा पाकिस्तानचा निर्णय

**आणि**

- शेअर बाजारातल्या तेजीला लगाम /मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७३९ , तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत २७० अंकांची घसरण

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. या दोन्ही आघाड्या आपापल्या मित्रपक्षांसोबत एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत.

आगामी विधानसभा निवडणूक महायुती सर्वशक्तीनिशी एकत्रितपणे लढवणार असल्यामुळे तिला सर्वाधिक जागा मिळतील, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ते आज आज मुंबईत भाजपा प्रदेश

कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं भारतीय जनता पार्टी जवळपास ९७ हजार बूथ, शक्तीकेंद्र तसेच मंडल स्तरावर संघटना मजबूत करायला प्राधान्य देणार आहे अशी माहिती त्यांनी दिली. काल आणि आज झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीविषयीची माहितीही त्यांनी दिली. २१ जुलै रोजी पुणे इथं पक्षाचं अधिवेशन होणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. विधानसभा निवडणुकीसोबतच भाजपा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत आणि महापालिका निवडणुकांच्या तयारीला लागणार आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाविकास आघाडी आगामी विधानसभा निवडणुकीला एकत्र सामोरी जाणार असून तिन्ही घटकपक्ष एकत्र बसून जागावाटपावर चर्चा करतील, अशी माहिती अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिली आहे. काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची आज मुंबईत बैठक झाल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीत काँग्रेसचं संघटन मजबूत करण्यावर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसभा आणि त्यानंतर देशभरात झालेल्या पोटनिवडणुकीतही भाजपाचा पराभव झाला आहे.

महाविकास आघाडी विधानसभा निवडणुकीतही राज्यातल्या महाभ्रष्ट महायुती सरकारला सत्तेपासून दूर करेल, असा निर्धार या बैठकीत केल्याचं वेणुगोपाल यांनी नमूद केलं. के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण आणि इतर नेते उपस्थित होते.

<><><><><>

मायक्रोसॉफ्ट कंपनीचं सॉफ्टवेअर बंद पडल्यानं जगभरातले उद्योग, बँकिंग सेवा आणि विमान कंपन्यांची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा आज कोलमडून पडली आहे. त्यामुळे भारतात विविध विमान कंपन्यांची बुकिंग, चेक-इनची ऑनलाइन सेवाही ठप्प झाली. याचा सर्वाधिक फटका मुंबई विमानतळाला बसला असून विमानसेवा सरासरी ५० मिनिटे उशिरानं सुरू आहे. समस्या सोडवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं विविध विमान कंपन्यांनी सांगितलं आहे.

सरकार मायक्रोसॉफ्टशी संपर्कात असून या बिघाडामागचं कारण सापडल्याची माहिती, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. क्राऊडस्ट्राईक या अमेरिकेच्या सायबर सुरक्षा देणाऱ्या कंपनीशी या बिघाडाचा संबंध असल्याचं वृत्त आहे. सुरक्षेसंदर्भातली माहिती गोळा करण्यासाठी अनेक व्यावसायिक संगणकांमधे फाल्कन सेन्सर बसवल्यामुळे ही समस्या निर्माण झाली असून ती सोडवण्यासाठी अंभियंते प्रयत्नशील असल्याचं कंपनीनं सांगितलं.

दरम्यान, या परिस्थितीवर नागरी विमान वाहतूक संचालनालय आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालय लक्ष ठेवून असल्याची माहिती नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रत्यक्ष चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लवकर विमानतळावर पोहोचावं अशी विनंती अनेक विमान कंपन्यांनी केली आहे.

<><><><><>

मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या विकासकामांसाठी १ हजार ८८ कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज जिल्हा नियोजन

समितीच्या बैठकीत दिली. या निधीपैकी एक हजार १२ कोटी जिल्हा वार्षिक योजनेसाठी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ७१ कोटी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरच्या योजनेसाठी ५ कोटी ७१ लाख रुपये निधी देण्यात येणार आहे, असं लोढा यांनी सांगितलं. या बैठकीला खासदार संजय दिना पाटील, आमदार प्रवीण दरेकर, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी उपस्थित होते.

<><><><><>

नंदुरबारमधले प्रलंबित वन दावे वर्षभरात मार्गी लावण्यासाठी तालुकानिहाय चार सदस्यीय समितीची स्थापन करुन दर महिन्याला आढावा  बैठका घेण्याचे निर्देश दिल्याचं राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष  अंतरसिंग आर्या यांनी आज सांगितलं. ते नंदुरबारच्या दौऱ्यावर असून जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.  पाच हजारांहून अधिक आदिवासी बांधवांनी वनदाव्यांविषयी आपल्याकडे तक्रारी केल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांनी तळोदा तालुक्यात आमलाड इथल्या आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहाची पाहणीही केली.

<><><><><>

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या  विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगानं गुन्हा दाखल केला आहे. परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन करत पूजा खेडकर यांनी स्वतःचं, वडिलांचं आणि आईचं नाव बदललं, छायाचित्र, स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल नंबरसह पत्ता बदलून आपली खोटी ओळख दाखवल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवला आहे. तसंच सनदी सेवेतली त्यांची निवड रद्द का करु नये यासाठी कारणे दाखवा नोटीसदेखील जारी केली आहे.

दरम्यान, पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचे आरोप केल्या संदर्भात पूजा खेडकर यांना उद्या २० तारखेला पुण्यात जबाब नोंदवण्यासाठी दुसरी नोटीस दिली आहे. त्यांना याआधी नोटीस देऊन काल उपस्थित राहायला सांगितलं होतं, मात्र त्या उपस्थित राहिल्या नव्हत्या.

<><><><><>

महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाचा सामना पाकिस्तानशी होत आहे. श्रीलंकेमध्ये दाम्बुला इथं रनगिरी दाम्बुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर  हा सामना होत आहे. पाकिस्तानने नाणेफेक जिंकली असून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, आज दुपारी झालेल्या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात नेपाळने संयुक्त अरब अमिरातीच्या संघावर ६ गडी राखून विजय मिळवला आहे.

<><><><><>

शेअर बाजारातल्या गेल्या ४ सत्रांमधल्या तेजीला आज आळा बसला. आज सकाळच्या सत्रात दोन्ही निर्देशांकांनी विक्रमी उंची गाठली होती. मात्र ही तेजी फार काळ टिकू शकली नाही. गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिल्यामुळे बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७३९  अंकांनी घसरला आणि ८० हजार ६०५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७० अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ५३१ अंकांवर बंद झाला.

धातू, वाहन उद्योग, आर्थिक सेवा आणि ऊर्जा क्षेत्राच्या समभागांनी मोठी घसरण नोंदवली.

जागतिक बाजारातली कमकुवत स्थिती आणि अमेरिका आणि चीन दरम्यानचा वाढता व्यापार तणाव आजच्या घसरणीला कारणीभूत ठरल्याचं बाजार विश्लेषकांनी सांगितलं.

**<><><><><>**

**कोल्हापूर** जिल्ह्यात आज दिवसभर जोरदार पाऊस सुरु आहे. गगनबावडा, भुदरगड, राधानगरी, आजरा, चंदगड आणि शाहूवाडी तालुक्यात धुवांधार पाऊस सुरु आहे. जिल्ह्यातली चारही धरणं पूर्ण क्षमतेनं भरली असून, धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु झाल्यामुळे नद्यांच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. जिल्ह्यातल्या नद्यांवरचे ७४ बंधारे पाण्याखाली गेले असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. हवामान विभागानं जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून प्रशासनानं नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात गेले दोन दिवस मुसळधार पाऊस पडल्यामुळे नद्यांना पूर आला आहे. जिल्ह्यातल्या तीन मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. सिरोंचा इथल्या शासकीय वसतिगृहात पाणी शिरल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागानं विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. हवामान विभागानं जिल्ह्याला पुढले २४ तास रेड अलर्ट जारी केला आहे.

**भंडारा** जिल्ह्यातल्या गोसेखुर्द प्रकल्पाचे ९ दरवाजे उघडण्यात आले असून, धरणातून १ हजार १११ क्युमेक्स, तर गडचिरोली जिल्ह्यातल्या चिचडोह बॅरेजमधून ५ हजार ४२६ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरु आहे. भंडारा इथं वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला तर ३ महिला जखमी झाल्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अती जोरदार पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे. या काळात किनारपट्टी भागात जोरदार वारे वाहतील